

# पं. कुमार गंधर्व

यांची


सहा व्याख्याने

१३ मे ते १८ मे १९८५

**META GRAPHS PRIVATE LTD.**

*Manufacturers of :*
**Aluminium Anodised Labels,**
**Decorative Plates, Grills,**
**Panels. Advertising Novelties etc.**

*Regd. Office :*
164, Senapati Bapat Marg
Matunga (w.) BOMBAY 400 016
Telephones : 453853, 458688
Telegram : METAGRAPHS




## पंडित कुमार गंधर्व

भारतीय संगीताच्या क्षेत्रात 'अनन्यसाधारण' हे विशेषण परमार्थाने ज्याच्या मागे लावता येईल असे एकमेव नाव—**पंडित कुमार गंधर्व**. परंपरेचा वारसा डोळसपणाने चालवून, त्या बरोबर अभिनवतेचा सतत साक्षात्कार घडविणे, हे त्यांच्या लोकोत्तर प्रतिभेचे वैशिष्ट्य आहे. 'नच पार नादनिधिला' याची जाणीव ठेवून त्या अथांगाचा शोध घेत राहावे आणि त्यांतील नवी नवी सौंदर्ये रसिकांना सादर करावी', हे कुमारांचे जीवितकार्य आहे. कुमारांना समग्र कलाविश्व संवेदनेने उमजले आहे, तशी त्या विश्वाची रूपे आणि स्पंदने त्यांच्या तरल आणि तीव्र बुद्धीनेही न्याहळलेली आहेत. म्हणून तर प्रतिभा आणि बुद्धिमत्ता यांचा सुरेल मिलाफ त्यांच्या ठायी आढळतो. या अलौकिक प्रज्ञावंताच्या सहवासात आणि संभाषणामधून आपल्या मनांतल्या अनेक प्रश्नांची उत्तरे मिळावीत, निदान ते प्रश्न स्पष्ट व्हावेत आणि आपल्या जिज्ञासेला नवे अंकुर फुटावेत, एवढीच आमची अपेक्षा आहे.



## शिवपुत्र सिद्धरामय्या कोमकली तथा पंडित कुमार गंधर्व : जीवनदर्शन

- ८ एप्रिल १९२४ : बेळगावजवळ सुळेभावी (कर्नाटक) या गावी जन्म
- १९३६ : जिना हॉल, मुंबई येथील कॉन्फरन्समध्ये गाणे
- १९३६–१९४७ : प्रो० देवधर यांच्याकडे संगीताचे शिक्षण
- १९४७ : भानुमती कंस यांच्याशी विवाह
- १९४८ पासून देवास (मध्यप्रदेश) येथे वास्तव्य
- १९४७ ते १९५१ : दुर्धर आजाराशी झुंज व त्यातून मुक्तता
- याच काळात लोकगीतांचे मंथन : अंतर्यामी संगीताचा साक्षात्कार : 'मला गाणे आले'
- ११ ऑक्टोबर १९५९ : देवासमध्ये 'कुमार संगीत अकादमी'ची सुरुवात
- १९६१ : भानुताईंचे निधन
- १९६२ : वसुंधरा श्रीखंडे यांच्याशी विवाह
- ३१ मे १९६५ : स्वरचित बंदिशी आणि राग यांच्या स्वरांकनांचा
- ग्रंथ : 'अनूपरागविलास'चे प्रकाशन
- ३१ जुलै १९६६ : 'घन गरजन आये' हा गीतवर्षाचा पहिला कार्यक्रम
- सप्टेंबर १९६६ : 'ऋतुचक्र' हा संगीत कार्यक्रम
- ३१ ऑक्टोबर १९६७ : 'त्रिवेणी' कबीर, सूरदास आणि मीरा यांच्या पदांचा विशेष कार्यक्रम
- जुलै १९६८ : 'मला उमजलेले बालगंधर्व' : नटसम्राट बालगंधर्व यांना संगीत श्रद्धांजली
- डिसेंबर १९६८ : 'गीतहेमंत'
- जुलै १९६९ : ठुमरी, टप्पा, तराणा
- जून १९७० : मालवा की लोकधुनें
- मे १९७१ : 'गीत वसंत'
- २६ नोव्हेंबर १९७३ : तांबे गीत रजनी : कविवर्य भा. रा. तांबे
- यांच्या जन्मशताब्दीनिमित्त संगीत कार्यक्रम
- १३ एप्रिल १९७३ : 'तुलसीदास' एक दर्शन-रामचरितमानस चतुश्शती कार्यक्रम
- १३ मार्च १९७६ : ऋतुराज महफिल : वसंतगीते
- जून १९७६ : राग गौड मल्हार दर्शन
- ६ ऑगस्ट १९७६ : तुकाराम–एक दर्शन
- १९८४ : गांधर्व महाविद्यालय, दिल्ली, यांच्या विद्यमाने,
- षष्ठ्यब्दिपूर्तीनिमित्त एशियाड इंद्रप्रस्थ स्टेडियमवर अभिनंदन-समारंभ



## कुमार गंधर्व : मानसन्मान

- २ फेब्रुवारी १९६२ : सन्मान • खेतिया कला मंडळ
- १२ ऑक्टोबर १९६२ : डॉक्टर ऑफ म्युझिक • अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ
- २७ ऑक्टोबर १९६९ : मानपत्र • महाराष्ट्र समाज, देवास
- ११ ऑक्टोबर १९७० : मानपत्र • देवास नगरपालिका
- ११ फेब्रुवारी १९७३ : डी. लिट् • विक्रम विश्वविद्यालय, उज्जैन
- १ एप्रिल १९७३ : शासकीय सन्मान • मध्य प्रदेश कला परिषद, भोपाळ
- १० ऑगस्ट १९७३ : मानपत्र • सरगम, उज्जैन
- १९७३ : उत्सव • मध्यप्रदेश शासनाचा राजकीय सन्मान • मध्यप्रदेश कला परिषद
- १० नोव्हेंबर १९७४ : मानपत्र • सार्वजनिक अभिनंदन समारंभ, देवास (५० व्या वाढदिवसानिमित्त)
- ६ डिसेंबर १९७४ : राष्ट्रीय पुरस्कार • केंद्रीय संगीत नाटक अकादमी, नवी दिल्ली
- ३० मार्च १९७५ : मानपत्र • कर्नाटक संघ, इंदूर
- १९७६ : कुमार गंधर्व प्रसंग • मध्यप्रदेश कला परिषद, भोपाळ
- १९७६ सप्टेंबर-ऑक्टोबर : 'पूर्वग्रह' या साहित्य कलाविषयक द्वैमासिकाचा 'कुमार गंधर्व विशेषांक • मध्यप्रदेश कलापरिषद • भोपाळ
- १९७७ : पद्मभूषण • केंद्रशासनाकडून गौरव
- १३ फेब्रुवारी १९८३ : शिखर सन्मान • मध्यप्रदेश शासन-संस्कृती विभाग
- ८ एप्रिल १९८४ : ६० व्या वाढदिवसानिमित्त अभिनंदन समारोह आणि रु. १,५०,००० चा निधी प्रदान • गांधर्व महाविद्यालय, दिल्ली यांच्यावतीने
- अशोक वाजपेयी संपादित 'कुमार गंधर्व' ग्रंथ प्रकाशित • उस्ताद अल्लाउद्दीन खाँ संगीत अकादमी, भोपाळ
- १३ फेब्रुवारी १९८५ : कालिदास सन्मान • मध्यप्रदेश कलापरिषद, भोपाळ

# 'नैया मोरी निके निके चालन लागी'

इंदिरा संत

रानात गमतीने हिंडत असावे. "अग, तो बघ किती सुंदर पक्षी" असे कुणी उसळत्या आवाजात सांगावे. आपण प्राणपणाने इकडे तिकडे बघावे; तो त्याचा निसटता पंख दिसावा, किंवा तो झुडुपातून दिसला न दिसला व्हावा. आयुष्यात असे निसटून जाणारे अनुभव खूप असतात.

कुमारजींच्या स्वरविलासाचा माझा हा अनुभव असाच. आम्ही पुण्याला होतो त्या वेळची गोष्ट. एक दिवस ते सांगत आले "मोठ्या आजारानंतर कुमार गंधर्व आज गाणार आहेत. आपण जायचेच." आमचे गाणे ऐकणे म्हणजे नामदेवाच्या पायरीवर उभे राहून. गाभाऱ्यात वा सभामंडपात आम्ही काय जातो! बाहेर कुठे उभे राहून आमची श्रवणसाधना. स्वरांचा जोरकस चढउतार, स्वरलयींची असंख्य आकारांची वळणं आमच्यापर्यंत पोचत होती एवढेच. ह्यांची त्यात तंद्री लागलेली. मी ते स्वरलयींचे खेळ कानांत साठवीत उभी होते. त्यावेळी गाणे फारसे कळत नव्हते, पण ते कानांत साठवणे फार गोड वाटत होते. काही वेगळे, निराळे मात्र जाणवत होते. आणि अजूनही ते 'निराळे' जाणवते, पण कळत नाही.

झुडुपात अदृश्य होणाऱ्या पक्ष्यासारखा हा स्वरविलास दुरून ऐकला तरी मनात राहिला. 'कुमारांचे गाणे' ही एक मनाला नकळतच ओढ लागून राहिली. नंतर आमचेही पुणे सुटले आणि गाणे दुरावले. कुमारजी बेळगावचेच. पण तिथे त्यांचे कधी गाणे झालेले नाही. एकदा तेथील संगीतोत्सवात ते गायले. पण मुलाच्या आजारपणाने मी त्याला जाऊ शकले नाही. गाणे ऐकायला नाही मिळाले तरी त्यांची भावगीते आणि काही शास्त्रीय गाणी ध्वनिमुद्रित होती.त्यांच्या मराठी गीतांतील 'अजुनी रुसून आहे' हे गीत मला फार आवडते. त्यातील 'रुसून आहे' या शब्दाभोवती खेळणाऱ्या नाजूक लहरी तर फारच लोभस वाटतात. कितीदा ऐकले तरी त्याचे ताजेपण जात नाही. नोकरीवरून आल्यावर संध्याकाळी मी रोज त्यांची ध्वनिमुद्रिका लावीत असे. त्या स्वरकल्लोळात न्हाले की कसे प्रसन्न, चमकदार वाटायचे. शीण कुठल्याकुठे पळायचा.

कुमार गंधर्वांची मैफल पाहण्याचा योग आला तो इचलकरंजीच्या साहित्यसंमेलनात. पु. लं. चे भाषण आणि कुमारांचे गाणे या ओढीने मी कधी नव्हे ते इचलकरंजीला गेले आणि कुमारांची मैफल ऐकून तृप्त मनाने परतले. इथे एक नवा अनुभव पदरात पडला. ऐकून कानांत साठवलेल्या

With Best Compliments From

**RAILWAY WINE MART**

(HOUSE OF QUALITY LIQUORS)

Raja Rammohan Roy Road
BOMBAY 400 004

गाण्यापेक्षा प्रत्यक्ष मैफल ऐकण्याने त्या गाण्याला एक नवे मनोज्ञ असे परिमाण लाभते. एरवी आपल्याला स्वरलयींचाच आनंद मिळतो, पण गायकाचा चेहरा, त्याचे डोळे, त्याचे मानेचे हेलकावे, हातांचा मोकळा खेळ, बोटांच्या नर्तनांची वलये या सर्वांतूनच स्वरलय भिनलेली असते-ती त्या गाण्याला एक नवेच रूप देते. हे मी तिथे प्रत्यक्ष अनुभवले.

कुमारजींच्या स्वराला जिथे विजेसारखी धार आहे, तिथे तिला आकाशाची ओढ आहे. त्या ताना स्तिमित करतात आणि त्यावेळचे हातांचे नर्तन जोष आणते. जिथे त्यांचा आवाज कोमल आहे तिथे त्याला जाईच्या वेलीच्या नाजूक तणाव्यांची झालर आहे. आणि त्यावेळच्या बोटांच्या नर्तनाला जळलहरींचे मार्दव आहे. कुमारांचे गाणे म्हणजे शब्दांचे 'शब्दपण' कसे असते ते सांगणारे आहे. शब्द स्वरवल्यांनी नादमय करून त्यात रस भरावा तर तो त्यांनीच. अशा या सर्व शक्तीमुळे कुमारांचे गाणे हा एक शक्तिसौष्ठवाचा सहजाविष्कार वाटल्याशिवाय रहात नाही. आता एकदा प्रत्यक्ष गाणे ऐकल्यावर रेकॉर्डवर ऐकणे मिळमिळीत वाटायला लागते. समाधान होत नाही. आमचे श्रीमान योगी रणजित देसाई, नेहमी कुमारांच्या मैफलींसाठी दौरे काढीत, देवासलाही जात. आले बेळगावी आणि भेटले की कुमारमय होऊन म्हणत "ताई, काय सांगू तुम्हांला ताई" असे म्हणत वर्णन करतील तेवढेच.

पण नियती मोठी लबाड असते. आणि तितकीच कंजूषही. एकादा सोन्याचा क्षण ती आपल्यापाशी राखून ठेवते आणि ध्यानीमनी नसताना मोठा उदारपणा दाखवून तो आपल्या हातावर ठेवते. अशा वेळी आपण अगदी आनंदचकित होऊन जातो. गेल्या मार्चमध्ये मुंबईत असताना हा क्षण माझ्या हातात आला. मी वासंतीकडे (मुझुमदार) होते. एक दिवस अरुण सांगत आले "वासंती, आज कुमारजी संध्याकाळी येणार आहेत. जेवायलाही राहतील". मुंबईतल्या त्या प्रदूषणग्रस्त घुसमटलेल्या आकाशात तेव्हापासूनच मला संध्याकाळची निळसर लाल छटा दिसू लागली. स्वरांतून दिसलेले, तबला, पेटी तानपुऱ्याच्या सरंजामात बादशहासारखे बसलेले कुमार गंधर्व मी पाहिले होते. आज मित्रभावाने ओथंबलेले कुमारजी मला दिसणार होते.

हातातील काळ्या झोळण्याला हेलकावे देत, हसतमुखसे आणि किंचित झुलत चालणारे कुमारजी आतल्या खोलीत आले आणि मऊशार बैठकीवर लोडाला टेकून आरामात बसले. झोळण्यातील तंबाखूची डबी काढून समोर ठेवली. झोळणा व्यवस्थितपणे बाजूला ठेवला. समोर वासंती, अरुण हे जिव्हाळ्याचे मित्रद्वय होते. बाजूला तत्पर अशी कुमारांची कन्या कलापिनी बसली होती मी समोर. "तुम्हांला अवार्ड मिळाले.

With Best Compliments
from

**VIRA PROPERTIES PRIVATE LIMITED**
33/1, Grant Road, Bangalore : 560 001

*If you want luxurious apartments centrally located in garden city of Bangalore; contact us.*

आनंद झाला. तुम्ही बेळगावच्या ना ? कुठे राहता ?"

त्यांच्या या प्रश्नाला मी उत्तर दिले. "तुमचे संगमेश्वर गुरव राहतात ना वडगावला, तिथे जवळच आमचे घर."

"मी बेळगांवला मधून मधून जातो. पण गुपचुप जातो हो. आता गेलो की तुमची चौकशी करीन. संगमेश्वरकडून कळवीनच. आमचाच की तो. तो आता धारवाड युनिव्हर्सिटीला आहे. कळवीन मी तुम्हाला."

तो बोलण्यातील कानडी आघात, तो कर्नाटकी निर्व्याज मोकळे-पणा ! मनात आले, या कुमारजींनी महाराष्ट्र ओलांडला; हिंदीभाषिक प्रांत जवळचा केला. पण यांनी कर्नाटकी थाटाचे बोलण्याचे वळण आणि कर्नाटकी दिलखुलास मोकळेपणा कसा जपून ठेवला आहे. त्यांच्या एकूण व्यक्तिमत्वाला त्याने एक प्रकारचा गोडवा आला आहे.

मधूनच तंबाखूची चिमूट जिभेवर टाकण्याची शान, मधूनच समोरच्या काचपात्रातील पेयाचा ओझरता आस्वाद आणि गप्पा–फालतू नव्हे, कुणाबद्दलच्या नव्हे. निखळ संगीताबद्दलच्या. कबीराच्या भजनाबद्दल बोलत होते. त्याच्या एका भजनाची त्यांना ओढ होती. "नैया मोरी, निके निके चालन लागी–" हिचे भावसौंदर्य ते स्वर-लयीच्या सौंदर्यातून कसे उलगडते, त्याविषयी सांगणार होते. 'माझं आयुष्य ही नाव, मी आत. खेवट तो. तो चालवणारा. वादळ वारे आले, उलथली, डोक्यावर पर्वता-सारखे ओझे आले. मला त्याचे काही नाही. तो चालवणारा सर्व बघून घेतो. मी या नावेत कसा डुलत डुलत सुखात जातो आहे–" असे म्हणत त्यांनी शेजारची एक वही घेऊन तिच्यावर ठेका धरला "नैया मोरी–" या स्वराने मी दचकलेच. 'माझी नाव' ही अस्मिता त्या स्वरांतून, त्या हातातून आणि त्या नजरेच्या फेकीतून सळसळली–आणि मग लगेच स्वर कोमल झाला, तानांच्या बारीक लहरी झाल्या. लयीला मार्दव आले आणि दोन्ही हातांची पाच बोटे मिटून त्यांच्या नर्तनातून, स्वरांतून मानेच्या हेलकाव्यातून प्रकट झाले ते संथ वाहणाऱ्या नदीमध्ये डुचमळत ठुमकत चाललेल्या नावेचे चित्र.

"आंधी मेघा" ला आवाज आकाशात भरून आला. त्याला अनुसरून ते हातवारे....शब्दांना अर्थ देणाऱ्या ताना....पुन्हा कोमल स्वरांत नावेचे लाडिक हिंदकळणे. 'या बहुहिलकी अकथ कथा है, विरले खेवट जाने" येथपर्यंत गाणे आले, नाव हिंदकळू लागली....या संसाराच्या कठीण प्रवासात एक श्रद्धा आपल्याला "निकी निकी चालन लागी" हे आनंदमय समाधान मिळवून देते. हे मनोमनी कळले. मनोमनीच त्या स्वरविलासाचे मी पाय धरले. तेव्हापासून "निकी निकी" मनात सारखे

With Best Compliments From

PAITHAN SILK MILLS
(Prop. Permaform Constructions Pvt. Ltd.)

D-64, T. T. C. MIDC, TURBHE, THANE

घोळते आहे. अनुभवाला येते, ते नव्याने जाणवते आहे. "नैया मोरी निके निके चालन लागी". कुमारजी हे सहज देऊन गेले, ते जन्मभर पुरणारे आहे.

हा बहुमोल क्षण मी जपून ठेवते, तोच दुसरा नजराणा नियतीने समोर आणून ठेवला. यावेळी संध्याकाळी कुमारजी आणि डॉ. श्रीराम लागू येणार होते. दोघेही एकमेकांचे चाहते आणि आम्ही सर्व त्यांचे. डॉक्टर पूर्वीपासून माझ्या परिचयाचे. या बैठकीत आम्ही फक्त श्रोत्याचे काम केले. दोघांचाही मधुसंवाद चालला होता. विचार होता, शब्दमाध्य-मातील कलेखेरीज इतर कोणतीही कला आपले समर्थन करू इच्छीत नाही. ती स्तब्ध असते. निसर्गासारखी. आपण तिला समजून घेतो, जाणतो, पण ती मूक असते. केवळ शब्दमाध्यमच आपली प्रतिक्रिया शब्दांतून व्यक्त करू शकते. अशी काही चर्चा. दुसरा विचार म्हणजे कलेतील रसनिर्मितीची जाण. हा आनंद तात्पुरता असतो, कायमचा नसतो. रसनिर्मितीपलीकडे जी कला आपल्याला नेऊन सोडते, तो कलानंद खरा असतो. सर्व रस संपतात त्यानंतरची अवस्था म्हणजे आनंद ! हा आनंद समाधानाच्या तंद्रीचा असतो. आणि त्याला शब्द नसतात. तो मूक असतो. असा आनंद देते ती खरी कला आणि असा आनंद अनुभवतो तो खरा जाणकार रसिक. हे माझे लिहिणे किती बोजड झाले आहे ! हे सर्व मधुसंवादाच्या स्वरूपात ऐकणेच आनंदाचे.

त्यांची चर्चा संपल्यावर कृतज्ञतेचे एक प्रतीक म्हणून मी कुमारजींना 'मृण्मयी' हे माझे पुस्तक दिले. पुस्तक उघडत ते म्हणाले, 'फार आनंद झाला. मी आता हे वाचीन." आणि आतील अक्षरे पाहून म्हणाले, "ताई, तुम्ही लिहायला चुकलात. इथे 'नय्या' नको, 'नैया' हवे. आमच्या तिकडे 'नय्या' हा शब्द 'नथ' या अर्थी वापरतात. मी ते ओशाळून दुरुस्त केले. त्यांचे नाव लिहिण्याअगोदर 'नय्या' मोरी निके निके चालन लागी' हे मी आठवणीसाठी लिहिले होते. त्यातील ती चूक होती. दुरुस्त करून देताच म्हणाले, "आता छान झाले. हे तुमचे पुस्तक मी वाचणार आहे." एवढ्या मोठ्या कलाकाराने हे मला दोनदा सांगावे, याने माझे मन भरून आले. दुसऱ्याने ते उघडूनही न पाहता बाजूला ठेवून दिले असते. या थोर कलाकाराला कानडीइतकेच मराठी येत होते, आणि या संगीतातील महर्षीला काव्याची देखील आवड होती.

डॉक्टरांनाही मी पुस्तक दिले होते. त्यांनी 'मृण्मयी'तील वेचक अशा चार कविता म्हटल्या. अगोदरच डॉक्टरांना काव्य अतिशय प्रिय. त्यात ते अभिनयसम्राट. मग कवितेचे वाचन असे झाले की, ही माझीच कविता

*WITH BEST COMPLIMENTS FROM*

**VIRA PROPERTIES (MADRAS)**

33/1, GRANT ROAD
BANGALORE 560 001

*If you are looking for prestigious centrally located office space on Mount Road, Madras; contact us.*

काय असा मला संभ्रम झाला. वाचन ऐकण्यासारखे, बघण्यासारखे, मन हलवून टाकणारे, श्रोताही तसाच अत्यंत संवेदनक्षम, कोमल वृत्तीचा, जाणकार रसिक, स्वरलयींचा स्वामी असा. वाचन संपताच कुमारांनी आपले पुस्तक झोळण्यात व्यवस्थित ठेवले. एक शब्दही बोलले नाहीत.

"पुस्तक दिलेत. आनंद झाला. आता वाचतो." असे जाताना सांगायलाही ते विसरले नाहीत. आठ-दहा दिवसांनी त्यांचे 'अनूपराग विलास' हे पुस्तक वाचले आणि कळले की ते खरेच कवी आहेत. त्या पुस्तकातील त्यांनी बांधलेल्या चिजा म्हणजे कविताच. किती वाचली तरी पुरी वाटेना. आणि त्यांच्या या कविवृत्तीनेच त्यांना लोकगीतांतील सौंदर्य स्वरांतून व्यक्त करायला लावले असावे.

काही दिवसांनी मी मुंबई सोडली. आता मला वाटते, नियतीने आणखी एक सोन्याचा क्षण माझ्यासाठी राखून ठेवलेला असणार. कुमारजींनी, बेळगावी आल्यावर चौकशी करीन-कळवीन असे आवर्जून सांगितले आहे. त्यांच्या या बोलण्यावर माझा विश्वास आहे. ते येतीलच. बरोबर संगमेश्वरही असतील.

बेळगावच्या त्या लाल मातीला जणू मिसळण अशा एखाद्या आरक्त संध्याकाळी ते घरी येतील. मधुसंवादात लोकगीतांचे सौंदर्य उलगडून दाखवतील. आणि त्यातील स्वर, शब्द, लय यांचे सामर्थ्य सोप्या शब्दांत सांगतील—तंबाखूची चिमूट जिभेवर टाकून शेजारचे पुस्तक मांडीवर ठेवून ठेका धरत म्हणतील :

"जा, ज्यो रे बदरवा
जाय तू तो सैंयाजी खेता बैसोर'
जाय सुनावो, मैं तो हे पठावा
गरजो रे पिया मुख हरसो रे

भाववृत्तींचे गाढपण स्वरात कसे येते ते विशद करतील :

"निमोरिका मौरा है रे,
गमकीला है मन बौरा येरे
बौरा चेता बौराये रे हो,
ये उतपतिया पे मन बौरा रे...."

त्या क्षणाची मी वाट पहात आहे.

With Best Compliments
from

**DUGAL PROJECTS DEVELOPMENT COMPANY PVT. LTD.**

HOECHST HOUSE, NARIMAN POINT, BOMBAY-400 021

## कुमार गंधर्व : सुरांतल्या आठवणी

श्रीनिवास विनायक कुलकर्णी

पृथ्वीभर आकाराचा
एखादा चांदण्याचा तुकडा....
कोठें गोठून थांबलेल्या
काळछायांचा
स्फटिकरूप सागर....

कोठें भरारत भेटणारी
पंखदार पहाडांची
एक एक अवाढव्य मुद्रा....

गडद गूढ जंगलांची
आत्ममग्न शीळ....

वर पांखरांच्या स्वरलिपींची
तरळती अनवट पखरण....

अन्तःसृष्टींतल्या अदृष्टांची
पाठोपाठ सरकती रांग....
ऐकलेल्या अमूर्तांची
एक एक कालनिरपेक्ष आठवण....

सूर :
दूर नेणारे
स्वतःतून स्वतःत....
सुरांतल्या आठवणी :
निर्गुणी....

With Best Compliments
From

**PEERLINE SYNTHETIC WEARING INDUSTRIES**

Shed no. 4, Bharat Builders,
Ram Mandir Road, Goregaon (East),
Bombay-400 064.

With Best Compliments
from

**ORIENTAL SYNTHETIC &
RAYON MILLS PVT. LTD.**

Plot No. 188/92, G. I. D. C.
Umbergaon, Gujrat

**BASMATI RICE**
**Exporters and Suppliers of**
**BASMATI RICE**
**Ask for any of**
**These Popular Brand**

OTHER RICE with QUALITY
KHA-KE-DEKHO BRAND
Rice with fine flavour
with good nutrition to

KING BRAND
fine LUCHAI Rice
most popular in
South Indian People

DOBAR & TIBAR OF BASMATI RICE

With All This Super
RENTIO BRAND TOOR DAL

THE HOUSE OF QU
Always Remember
M/s. PASOO ANAND
M/s. MEHUL TRADI

4, Keshavji Naik Road
Post Box No. 5043
Bombay-400 009.
Tel. No. 861565, 862639

ELEPHANT BRAND
REGD. T. M.
No. 817

⚜

DO TEER

⚜

Brand

⚜

ROSE Brand

⚜

BUTTERFLY Brand

⚜

TAJMAHAL Brand

⚜

*WHEN IN BOMBBY*
*STAY AT*

**RAILWAY HOTEL**

Charni Road Junction (Raja Ram Mohan Roy Marg),
Bombay-400 004.

- **HOME COMFORT**
- **BEER PARLOUR**
- **PERMIT ROOM**

*MODERATE RATES*



कुमार गंधर्व

८-१५-८४

कुमारजींचे हस्ताक्षर

नाद, त्रिताल, मध्य

सप्त सुर गावे गुनीजन
आठ राग नाद कोऊ कोऊ गाम ॥
सप्त सुर रंग तरंग आठ
अनंत नाद कर ध्यान गावे ॥

With Best Compliments From

**KHANZODE BROTHERS,
ENGINEERS, CONTRACTORS**

F/2, Rani Laxminagar, Nagpur-440 022
Phone : 23853



पं. कुमार गंधर्व : व्याख्यान १ ले

## पं. कुमार गंधर्व यांच्या व्याख्यानासाठी योजिलेली

# प्रश्नावली

स्वर–लय–ताल

१. या सत्राला प्रारंभ करताना संगीताच्या उगमाविषयी तुम्ही काही सांगाल का ?

२. माणसातल्या मूलभूत सांगीतिक प्रेरणेचा विकास श्रुतिशास्त्रापर्यंत कसा होत गेला ?

३. आजच्या संगीतकारांनी हे सगळे शास्त्र जाणून घेण्याची जरुरी आहे का ?

- असल्यास का ?
- नसल्यास का नाही ?

४. स्वर हा संगीताचा मूलभूत घटक. स्वराकडे बघण्याचा दृष्टिकोन कसा असावा ?

५. स्वरात संगीतत्व कशामुळे येते ? कसे येते ?

- लयीच्या उगमाबरोबरच संगीतत्वाचा प्रवास सुरू झाला का ?
- स्वर लावण्याची तुमची पद्धती नुसती वेगळीच नव्हे, तर अभिनव वाटते. त्यामागे कोणता सांगीतिक दृष्टिकोन आहे ?
- स्वरांमधील संवाद आणि स्वरांच्या श्रुती यांचे सांगीतिक मूल्य सांगाल का ?

६. स्वर आणि भाव यांचा संबंध आहे का ?

- कोणता ?

७. हे लयतत्व आकारातूनच जाणवते असे मानले, तर निसर्गातली लय आणि संगीतातली लय यांचे काही समीकरण मांडता येईल का ?

८. 'लय' ही संकल्पना समजावून सांगा.

*With Best Compliments From*

**SHREE VENKATESH PROPERTIES PVT. LTD.**

HOECHST HOUSE
NARIMAN POINT
BOMBAY-400 021

९. तालांची उत्पत्ती कशी झाली?

* बेसिक ठेंपोपासून परिष्कृत ताल हे कुठल्या सांगीतिक गरजेपोटी निर्माण झाले?

* उदाहरणार्थ : 'धिन् चक् चक्' हा ठेंपो. नंतर दादरा (१-२-३ / १-२-३ / १-२-३ / ४-५-६)

* आणि मग एकताल–१२ मात्रा, चौताल–१२ मात्रा, झुकताल–२४ मात्रा.

* एकाच ठेंपोपासून वेगवेगळे ताल का व कशासाठी होतात?

* तसेच, केरव्यापासून त्रिताल, १६ मात्रांचा दीपचंदी, ऊँटकी चाल, आध्धा, नाट्यसंगीतात वाजणारा तीन ताल, पंजाबी ठेका.

* ७ मात्रांच्या पटीतले सतरा, रूपक, दीपचंदी, आडा चौताल.

१०. शास्त्रीयत्वाकडे आपण जातो, तेव्हा लयीची गती विलंबित होत जाणे, तसेच तालाचा स्पॅन मोठा होत जाणे अपरिहार्य आहे का?

११. शास्त्रीय संगीत आणि ललित संगीत असा भेद करताना ताल ही देखील एक कसोटी आहे का?

१२. आपल्याकडे ५ मात्रांचा ताल प्रचारात का नाही? गायला का जात नाही?

१३. इतर संगीतपद्धतींची तुलना करता, उत्तर हिंदुस्थानी संगीतातील तालविचाराची वैशिष्ट्ये काय आहेत?

१४. ताल गायले गेले पाहिजेत आणि तसे ते गायले जात नाहीत, असे तुम्ही म्हणता. याचा अर्थ उदाहरणांसह सांगाल का?

* बंदिशीच्या बोलांमधून तालाचा आकार कसा दाखविता येतो?

With Best Compliments from

**SIMA HOTELS & RESORTS LTD.**

Hoechst House,
Nariman Point,
Bombay-400 021.

## रागसंगीत

१. रागसंगीत ही कल्पना समजावून सांगाल का ?

२. स्वरमेळाच्या वर्गीकरणासाठी केलेली 'राग' ही सोय आहे का ?

३. रागरूपे परिवर्तनशील असतात का ?

४. 'थाट' ही रागांच्या वर्गीकरणाची योग्य पद्धत आहे का ?

५. कुठल्या घटकांनी रागरूप सिद्ध होते ?
   • एकाच रागाचे विविध प्रकार कसे होतात ? कसे दाखविता येतात ? उदा. मल्हार, बिलावल, नट इत्यादी.

६. चीज अथवा बंदीश यांची व्याख्या काय ?

७. बंदिशीतून रागाचे विशिष्ट रूप संपूर्ण साकार होणे किंवा बंदिशीच्या बांधणीत आणि विस्तारात विशिष्ट रागरूपाचे सूत्र नेमकेपणाने सांगणे म्हणजे काय, हे स्पष्ट करावे.
   • उदाहरणार्थ, रागाचा उल्लेख करताना, 'जबसे तुम संग लागली'चा 'भूप' वेगळा आणि 'फुलवन सेज सवारूँ'चा 'भूप' वेगळा, असे का म्हटले जाई ?

८. एकाच रागातल्या मान्यता पावलेल्या वेगवेगळ्या बंदिशी त्या रागाचे वेगवेगळे पैलू दाखवतात का ?

९. चांगल्या बंदिशीचे घटक काय असतात ? कोणते ?

१०. चांगली बंदिश बंधनात राहूनही स्वैर असते म्हणजे काय, याचा उलगडा कराल का ?

११. कलावंताच्या व्यक्तिमत्त्वाची खूण पटवण्यासाठी बंदिश हेच साधन आहे का ?
   • असे असेल तर पूर्वसूरींची वैशिष्ट्ये काय होती ? प्रत्येकाची बंदिशीची फेक वेगळी असायची, असे म्हणतात म्हणून विचारले.

१२. रागाच्या अभिव्यक्तीसाठी 'सरगम'ची वेगळी गरज आहे काय ?

१३. रागातली पकड वगळून पुन्हा राग उरतो का ?
   • तसे असेल तर कशामुळे ?

१४. शास्त्रीय रागसंगीताच्या अभिव्यक्तीसाठी 'ख्यालगायकी' हाच एक अनुकूल गायनप्रकार आहे का ?
   • असल्यास असे का ?

१५. रागाच्या मांडणीतील अस्थाई, अस्थाईचे आलाप, अंतरा, अंतऱ्याचे आलाप, बोल आलाप, बोलतान, वेगवेगळ्या गतीची तानक्रिया. हा प्रचलित क्रम अपरिहार्य आहे का ?



पं. कुमार गंधर्व : व्याख्यान २ रे

Why Import Polynosic Fibre
and waste Valuable Foreign Exchange
WHEN

GRASILENE

(A High Performance Fibre)
is Freely Available to Meet Your Entire Demand

GRASILENE

has high wet and dry strength

GRASILENE

has good Pliability
It is not brittle, 1.2 Denier easily
Spinnable upto loos count

GRASILENE

Technical Know-how
Special Pulp and Machinery are all
developed indigenously

SUPPORT SWADESHI

Pl. SEND ENQUIRIES
GWALIOR

GRASIM

१६. तुमच्या गायनामध्ये हा क्रम किंवा ही शिस्त, यावरच तुमचे सर्व भान आहे, असे वाटत नाही. परंतु अत्यंत सूचक अशा स्वराकृतींनी रागरूप उभे राहते. या संदर्भात साधकाने कुठल्या भागाकडे लक्ष द्यायला पाहिजे?

१७. रागाची उपज आणि रियाज यांचा संबंध आहे का?

१८. 'रागांचे चलन' ही कल्पना स्पष्ट करावी. उदा. गौडसारंग आणि नट.

१९. संगीतविचारात रागांचे प्रकृतिधर्म मानले आहेत. यावर तुमचे विचार काय आहेत?

उदाहरणार्थ : ललत-करुण, दरबारी-गंभीर

* मग राग आणि भाव यांचा संबंध कसा असतो? कोणता असतो?

२०. शास्त्रीय अभिजात संगीतात स्वाभाविक राग मर्यादित आहेत का?


* असल्यास का?

0 0

*With Best Compliments from*

**KONDOR INTERIORS**

Blue Flame Apartment, Swami Vivekanand Road,
Bombay (West), Bombay-400 050





## विविध गायनप्रकार आणि 'मला उमजलेले बालगंधर्व'

१. ध्रुपद आणि धमार या गायन प्रकारांची सांगीतिक वैशिष्ट्ये कोणती ?

२. ख्यालाच्या निर्माणामागे कोणती सांगीतिक गरज होती ?

३. ठुमरी-टप्पा-तराणा ह्या अविष्कारांमागील सांगीतिक गरज कोणती ?
   * या प्रकारांच्या स्वतंत्र अस्तित्वाविषयी सांगाल का ?

४ शास्त्रीय संगीतातील सर्व गानप्रकारांत शब्दांचे प्रयोजन आणि स्वर-व्यंजनांचे स्थान कोणते ?

५. ठुमरी ठराविक राग, ताल, लय यांतच का गायली जाते ?

६. ठुमरी-टप्पा-तराणा असा क्रम तुमच्या विशेष कार्यक्रमात मानण्याचे कारण काय ?
   * त्या मागील सौंदर्यदृष्टी समजावून सांगाल का ?
   * तुमच्या 'ठुमरी-टप्पा-तराणा' या कार्यक्रमामागची प्रेरणा कोणती ?

७. 'मला उमजलेले बालगंधर्व' हा कार्यक्रम तुम्ही केला आहे. बालगंधर्वांच्या गायकीतील कोणत्या गुणांनी तुम्हाला आकर्षित केले ?

८. गंधर्व-संगीतासंबंधीचे तुमचे विचार, अपेक्षा आणि साध्य यांविषयी जाणून घेण्याची इच्छा आहे.

WITH BEST COMPLIMENTS FROM

**CENTURY RAYON**

(Props : **The Century Spg. & Mfg. Co. Ltd.**)

Industry House
159, Churchgate Reclamation
Bombay-400 020

## संगीतातील घराणी

१. ख्यालगायनाच्या पूर्वी घराण्यांची कल्पना होती का ?

  * 'बाणी' ही कल्पना 'घराणे' कल्पनेसारखीच आहे का ?

२. ग्वाल्हेरची समग्र गायकी, पंजाब, रामपूर, अब्दुलकरीम खाँ, फैयाजखाँ, अल्लादियाखाँ, ह्यांच्या गायकीची अंगभूत वैशिष्ट्ये कोणती ?

  * ह्या गायकांच्या वैशिष्ट्यांमुळे विवक्षित मूल्यांची स्थापना झाली का ?


३. फैयाजखाँ आणि अल्लादियाखाँ यांच्या सांगीतिक विकसनामागे ध्रुपद-धमाराची तालीम पायाभूत ठरली. या दोघांची संगीताला जी लयीची देणगी आहे, ती या ध्रुपद-धमाराच्या अभ्यासातूनच आलेली आहे का ?

  * तसे असेल तर घराण्यांची परंपरा चालू राहण्याच्या दृष्टीने ध्रुपद-धमार या मूलभूत स्रोताकडे जाण्याची आवश्यकता आहे का ?

४. 'घराणी' ही कल्पना मानण्यामुळे संगीताच्या विकासाला कोणते फायदे झाले ? नुकसान काय झाले ?

५. लोकसंगीतातून मूलस्रोत घेऊन घराणे निर्माण होऊ शकते का ?

0 0



पं. कुमार गंधर्व : व्याख्यान ४ थे


A Unique Quality
®
CAMEL
BASMATI RICE
For Real taste; Royal flavour
Sole Distributors:
P. A. TRADING CORPORATION
M Galli, Dana Bunder
PASU ANAND CORPORATION
Export Division
4, Keshavji Naik Road,
Bombay 400 009. Phone: 872 7541 • 868301,
Telex: 011-6702 IMC
Quality Product by:
ARORA RICE & GENERAL MILLS
(AMRITSAR)

## लोकसंगीत आणि ऋतुसंगीत

१. तुम्ही लोकसंगीताकडे का आकर्षित झालात ?

* कोणत्याही कलेच्या अथवा विचाराच्या, आत खोलवर दडलेल्या मूलभूत आणि अमूर्त रूपाकडे जाण्याची ओढ तुमच्यात कशामुळे निर्माण झाली ?

* कलेच्या मूलभूत फॉर्मकडे जाण्यामुळे, त्याच्या अभ्यासामुळे कलेच्या आविष्कारात वेगळे काय घडते ?

२. शास्त्रीय रागसंगीत आणि लोकसंगीत या दोन गोष्टी निकटच्या आहेत की दूरच्या ?

३. ख्यालात लोकसंगीताचा गुण (element) आणण्यामुळे कोणता नवा आकार निर्माण होतो ?

४. 'मालवा की लोकधुनें' या कार्यक्रमामागची प्रेरणा आणि विचार काय आहेत ?

५. तुमच्या मते रागरूप सिद्ध होण्यासाठी जे घटक आवश्यक समजले पाहिजेत, त्या घटकांच्या दृष्टिकोनातून धुन-उगम-रागांकडे बघता येईल का ?

* किंवा त्यांकडे कोणत्या दृष्टीने बघावे ?

६. ऋतुसंगीतामागील तुमची प्रेरणा कोणती ?

७. निसर्गातील ऋतूंचे बदल जे तुम्हांला जाणवतात, त्यांची बंदिशीत परिणती कशी होते, हे उदाहरणे घेऊन सांगा.

८. गीतवसंत, गीतवर्षा, गीतहेमंत, ऋतुराज मैफल हे चार कार्यक्रम कोणत्या विचारांतून, कसे निर्माण झाले ?

९. लोकगीतातील लयतत्त्व विकसनशील आहे का ?

१०. लोकगीताचा सांगीतिक आकार समजावून द्याल का ?

* लोकसंगीतात चारच स्वर असतात, असे मानले जाते. असे आहे का ?

* हे लोकसंगीताचे अविभाज्य वैशिष्ट्य आहे का ?

* इतर वैशिष्ट्ये कोणती ?

११. लोकसंगीतांत कोणकोणत्या रागांचे मूळ रूप दिसते ?

१२. लोकसंगीत जमवताना आणि ते समजून घेताना तुम्हांला कोण-कोणत्या अडचणी आल्या ?

* लोकसंगीताच्या जवळिकीतून रागनिर्मितीची स्पंदने तुम्हांला कशी जाणवली ते सांगाल ?



पं. कुमार गंधर्व : व्याख्यान ५ वे

*WITH BEST COMPLIMENTS FROM*

**ORIENTAL TRADING CO.**

2, Sukh Sagar, H. F. Society, 6th Road
Jogeshwari (East), Bombay-400 060

## मी ऐकलेले – पाहिलेले गाणे आणि माझे गाणे

१. तुम्ही लहानपणापासून गाता. अजाणत्या वयात आणि पुढील वयात तुम्ही जाणीवपूर्वक पाहिलेली संगीतसृष्टी, झपाट्याने बदललेला काळ आणि संगीतात झालेले बरेवाईट बदल, यांविषयीचे तुमचे निरीक्षण काय आहे ?

२. पं. पलुस्कर आणि पं. भातखंडे यांच्यासमोर शास्त्रीय संगीताच्या बाबतीत प्रचार, प्रसार, प्रतिष्ठा, सर्वसामान्यांनाही संगीतशिक्षण सहज घेता यावे अशी सोय, असे अनेक हेतू होते. त्यानुसार त्यांनी कार्य केले. त्यामुळे शास्त्रीय संगीताच्या शिक्षणाला संस्थात्मक स्वरूप आले. त्या काळात विशिष्ट प्रकारचे संगीत लोकांच्या कानांवर हॅमर होत नव्हते, तेव्हा पलुस्कर-भातखंड्यांचे हेतू सफळ झाले. आजच्या परिस्थितीत असे संगीत कानांवर सतत हॅमर होत असताना, संगीताची जाणीव वाढत असताना संस्थात्मक शिक्षणाचे प्रयोजन आहे का ?

   * या पार्श्वभूमीवर व्याकरणात्मक शिक्षण कितपत उचित आहे ?

३. निर्गुण परंपरेमध्ये शिष्याची आपल्या गुरुविषयीची जी धारणा (ॲटिट्यूड) अभिप्रेत आहे, ती आजच्या जमान्यातील गुरु-शिष्य परंपरेला लागू पडते का ?

   * संगीतात 'गुरू'चे स्थान काय आहे ?

४. संगीताची मेहनत आणि संगीताची साधना यांत तुम्ही फरक करता का ?

५. गेल्या काही वर्षांत गायनात भावनात्मकतेचे प्रमाण वाढत आलेले आहे का ?

   * त्यामुळे बढतीचा शिस्तवार क्रम आणि त्यातील सौंदर्य कमी होत आहे, असे वाटते का ?

६. श्रोता हा मैफलीतला एक घटक. श्रोता, आणि श्रोत्यांची अभिरुची यांचा मैफलीशी संबंध, यांविषयी सांगू शकाल का ?

७. मैफल ठरल्यावर तुम्ही तिच्याबद्दल काय विचार करता ?

   * तिच्या मांडणीबद्दल कसे निर्णय घेता ?

८. संगीत-समीक्षेविषयी काही बोलाल का ? कशी असावी ?

९. तुम्ही अनेक नवे नवे प्रयोग केलेत. तांबे गीत-रजनी, त्रिवेणी, तुकारामदर्शन, तुलसीदर्शन, मल्हारदर्शन (विशेषतः गांधीमल्हार) इत्यादी. अशा प्रयोगांची निकड अन्तःप्रेरणेने तुम्हांला का जाणवली ?

   * या प्रयोगांमधून तुम्हांला काय प्रकट करायचे होते ?

*GET GOOD VALUE FOR YOUR MONEY*

*Visit*

**RAILWAY REFRESHMENT ROOM**

(Railway Hotel)
Charni Road Junction
**Permit Room, Beer Parlour**
TV—VIDEO
FREE SNACKS

१०. भजन आणि त्यातून निर्गुणी भजन हा तुमच्या खास प्रेमाचा विषय आहे.

* भजनांचे सांगीतिक मूल्य तुम्हांला कसे जाणवले?

* निर्गुणी भजनासंबंधीचे तुमचे विचार जाणून घेण्याची उत्सुकता आहे.

११. सगुण भजन आणि निर्गुण भजन यांच्या आविष्कारात काही सूक्ष्म फरक होऊ शकतो का?

* निर्गुणी भजनांहून वारकरी भजने वेगळी असतील, तर ते वेगळेपण कोणते आहे, ते सांगाल का?

१२. तुम्हांला संतकवी कसे जाणवतात?

१३. निर्गुणी भजनातील आशयाचा तुमच्या संगीतावर आणि जीवनावर काही परिणाम झाला का?

१४. सर्व काही जीवनाशी निगडित असते, हा तुमचा विचार संगीताच्या संदर्भात उकलून सांगाल का?

---

प्रश्नावली :

वासंती मुझुमदार आणि सत्यशील देशपांडे

With Best Compliments
From

**A WELL WISHER**

WITH BEST COMPLIMENTS FROM

MEGHALAYA TIMBER PVT. LTD.

8/9, Bentinck Street, Calcutta - 700 001
and :
33/1, Grant Road, Bangalore - 560 001